थरूर

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on "*Sustainable Development Goals*"**

# शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज

**प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण**
*समाजशास्त्र विभागप्रमुख,*
*शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब*

*संक्षिप्त गोषवारा (Abstract) :*

शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी १७ कलमी कार्यक्रम जसे महत्वपूर्ण आहेत, तसेच शिक्षण हा एक घटक समाज परिवर्तनासाठी आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्वाचे असलेले दिसून येते. सामाजिक, मानवी आणि आर्थिक विकास जसे महत्वाचे आहेत तसेच निरंतर अथवा शाश्वत विकास देखील समाजाला विकासाच्या प्रक्रियेत कायमस्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून हे सर्व साध्य करण्यासाठी कोणत्याही राष्ट्राला आपल्या देशातील शिक्षण हे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देवून स्वतःच्या देशातील शिक्षण पध्दतीमुळे रोजगार निर्मीती करता येईल, असे प्रयत्न त्या देशातील शिक्षण व्यवस्थेने करणे गरजेचे आहे.

**Keywords: शाश्वत विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण**

**प्रस्तावना :**

शाश्वत विकासाच्या तत्वांचा अभ्यास केल्यास प्रत्येक खेडयाचा शाश्वत विकास करण्यासाठी ज्या दोन मुलभूत तत्वांचा वापर करता येणे शक्य आहे ती तत्वे म्हणजे स्वेच्छा दातृत्व आणि स्थानिक पातळीवरील लोकशाही सहभाग या दोन तत्वांच्या प्रभावी वापरातून आपल्या देशातील व राज्यातील गावांनी आपला कायापालट केला आहे व शाश्वत विकासाची वाट चोखाळली आहे.

शाश्वत विकासासाठी आपल्या देशाला तसेच इतर देशाला देखील गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे गरजेचे आहे. कारण विकसित देशात शिक्षण पध्दती ही फार गुणवत्तापूर्ण असून त्या देशातील युवकांना रोजगाराची संधी ही त्यांच्या शिक्षणामुळे प्राप्त होत असते. म्हणून आपल्या देशाला अथवा अन्य अविकसित अथवा विकसनशिलतेच्या प्रक्रियेत असलेल्या वेगवेगळया राष्ट्राला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज असलेले दिसून येते. त्यासाठी एकूणच त्या देशाच्या शैक्षणिक धोरणात तसे बदल घडवून आणणे फारच गरजेचे असल्याचे दिसून येते. तेव्हाच आपल्या देशाला किंवा अन्य देशाला शाश्वत विकासाची ध्येय आणि उद्दिष्ट प्राप्त करता येईल. यासाठी त्या–त्या देशांनी शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवून विकसित देश म्हणून पुढे येण्याची गरज आहे.

निसर्गाकडे सर्वांच्या गरजा भागविण्याची क्षमत आहे. मात्र सर्वांची हाव भागविण्याची क्षमता नाही. हे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची प्रसिध्द वाक्य शाश्वत विकासाचा मूलाधार आहे. हाव आणि गरज या दोन्हीतील फरक लक्षात घेवून Green based Economy dMwu Need based Economy कडे वाटचाल करण्याची गरज असलेले दिसून येते. हे कार्य जेवढे परिणामकारक आणि वेगाने होईल तितक्या लवकर शाश्वत विकासासाठी शिक्षण हे युनोचे शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

**शोध निबंधाचे महत्व :**

शाश्वत विकासासाठी आपल्या देशाला आणि अन्य अविकसित देशाला आज शिक्षण व्यवस्थेत बदल घडवून आणणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही देशाला निरंतरपणे विकसित म्हणून पुढे



Scanned with OKEN Scanner

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

यायचे असेल तर त्या देशातील सर्व स्तरातील शिक्षण पध्दतीत तसे बदल करणे फार गरजचे आहे. त्यासाठी त्या देशातील महत्वाची बाब म्हणजे शिक्षणाचे धोरण बदलणे गरजेचे आहे. तसेच त्या देशातील शासनव्यवस्था व सरकार यासाठी पुढाकार घेतल्यास हे बदल स्पष्टपणे काही काळानंतर दिसून येते व त्या देशात हळूहळू शिक्षणामुळे शाश्वत विकास होत असलेला दिसून येईल.

**संशोधनाची उद्दिष्ट :**

१. शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेणे.
२. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रक्रिया समजून घेणे.
३. शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्व समजून घेणे

**संशोधन पध्दती :**

शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज, हा शोधनिबंध लिखाण करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तूत शोध निबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा आधार घेण्यात आलेला आहे. या शोध निबंधात शिक्षणाचे महत्व, शैक्षणिक धोरण तसेच शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज कशी आहे, हे संशोधनात्मक पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केले जाणार आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना :**

१९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण व विकासाबाबतच्या वैश्विक आयोगाने आपले समान भविष्य या नावाने एक अहवाल प्रसिध्द केला. जो ब्रून्टलंड अहवाल म्हणून देखील प्रसिध्द आहे. या अहवालात दिलेली शाश्वत विकासाची व्याख्या सर्वाधिक मान्यताप्राप्त आहे. ती अशी

''शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढयांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय.''

शाश्वत विकास म्हणजे पृथ्वीवरील संसाधनांचा उपयोग करुन आपला विकास करताना पुढील पिढयांच्या विकासासाठी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे होय. शाश्वत विकास या शब्दात नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनांचा जपून आणि योग्य तितका वापर करणे अपक्षित आहे. जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक संसाधने आज मोठया प्रमाणात आणि अनियंत्रितपणे वापरली जात आहेत. आपल्या येणाऱ्या पिढयांचा विचार करुन जी मर्यादित संसाधने आहेत त्यांचा नियंत्रित वापर शाश्वत विकासात अपेक्षित आहे.

आपल्या बुध्दीच्या जोरावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करताना माणूस हा निसर्गचक्राचा एक घटक आहे याची जाणीव शाश्वत विकास या संकल्पनेत आहे. पृथ्वीवरील इतर कोणताही सजीव आपल्या गरजेपेक्षा जास्त संसाधनांचा वापर करत नाही. जीवो जीवस्य जीवनम हे निसर्गचक्र आहे. माणसाच्या सतत अधिक काही मिळवण्याच्या इच्छेमुळे तो सतत अधिकाधिक संसाधनांचा वापर करत असतो.

शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत जागतिक स्तरावर वेगवेगळे ध्येय आणि उद्दिष्ट निर्धारित केले असले तरी यामध्ये शिक्षण हे एक महत्वाचे घटक आहे. कारण की, मानवी विकासाचे ध्येय साध्य करावयाचे असेल तर त्यासाठी शिक्षण हे फारच महत्वाचे असल्याचे दिसून येते. म्हणून गुणवत्तापूर्ण शिक्षण हे शाश्वत विकासाचे एक महत्वपूर्ण घटक असल्याचे म्हणता येईल.



Scanned with OKEN Scanner

**शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज :**

समकालीन शिक्षण पध्दतीत फार मोठे बदल होत चाललेले आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेची उद्दिष्ट हे दर्जेदार शिक्षण देणे आहे, तसेच सर्वांसाठी शिक्षण या धोरणाने सर्व तळागाळातील गोर–गरीबांना शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी आजच्या परिस्थितीत सर्व स्तरातून शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेकडे जास्त लक्ष दिले जात आहे. दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी प्रत्येक क्षेत्रातून तसे प्रयत्न केले पाहिजे. त्यामुळे निश्चितच शाश्वत विकासाचे ध्येय प्राप्त करता येईल. त्यासाठी काही पैलूंकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

गुणवत्ता शिक्षणात वाढ करणे– शाश्वत विकासाचे उद्दिष्टचे असे आहे की, शाश्वत विकासाच्या अनेक परिमाणापैकी गुणवत्ता शिक्षण हे प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असलेला एक पैलू आहे. शिक्षण व्यवस्थेत काम करणाऱ्या तसेच अभ्यासक्रम तयार करणाऱ्या लोकांना समग्र अभ्यासक्रम आणि शाळेशी सबंधित अभ्यासक्रम व शैक्षणिक सुधारणात्मक दृष्टिकोन तयार करण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांमध्ये स्पर्धात्मकता निर्माण करुन त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण देवून शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करता येईल. शाळेच्या प्रशासकांना मार्गदर्शन करुन त्यांच्याच माध्यमातून शिक्षणासाठी पोषक पर्यावरण व वातावरण निर्माण करणे व प्रयोगात्मक शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करणे. शिक्षण सबंधित धोरण तयार करणाऱ्यांचे मनोबल वाढविणे व शिक्षण सुधारणामध्ये बदल घडवून आणून उच्चतम गुणवत्ता निर्माण करणारे शिक्षण धोरण तयार करणे गरजेचे आहे. शाश्वत विकासाची ध्येय साध्य करावयाची असेल तर शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होणे गरजेचे आहे. म्हणून त्यासाठी नविन गुणवत्ताधारक दर्जेदार शैक्षणिक धोरण बनविणे, अभ्यासक्रम निर्मीती, कोर्स कंन्टेन्ट, शिकविण्याची अध्यापन पध्दती आणि शिक्षण घेण्याच्या ठिकाणी महत्वपूर्ण पोषक वातावरण असणे गरजेचे आहे.

समकालीन शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, या शिक्षण पध्दतीत बदल होणे गरजेचे वाटते. कारण शाश्वत विकासाची ध्येय साध्य करावयाची असेल तर आपणास गुणवतेचं शिक्षण घेणे व मिळणे तितकेच महत्वाचे आहे. शिक्षण हे शाश्वत विकासासाठी फार महत्वाचे आहे, हे जरी सत्य असले तरी ते शिक्षण मात्र गुणवत्तापूर्ण असणे तितकेच महत्वाचे आहे. शाश्वत विकासाच्या ध्येय व उद्दिष्टामध्ये दर्जेदार शिक्षणाला विशेष महत्व दिले आहे.

समकालीन परिस्थितीत भारतातील शिक्षण पध्दतीकडे पाहिल्यास असे दिसून येईल की, आज आपल्याकडे शिक्षण हे शिक्षक केंद्रित झालेले आहे, असे वाटत आहे, हे शिक्षण विद्यार्थी केंद्रित होणे फारच गरजेचे असल्याचे दिसून येते. यामध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे. मुळातच शिक्षणाच्या प्रक्रियेत मुलांच्या क्षमतेनुसार अभ्यासक्रम आखून शैक्षणिक धोरणात तसे बदल घडवून आणावे लागतील. आपल्या देशातील शाळा, शिक्षणपध्दती, अभ्यासक्रम हे सगळंच शिक्षक केंद्रित आहे. ते बदलून आपणास विद्यार्थी केंद्रित करणे गरजेचे आहे असे शिक्षण क्षेत्रात काम करणारे लोक अनेक वर्षापासून म्हणत आहेत. परंतु याचे परिणाम आता कुठेतरी काही प्रमाणात दिसून येत आहेत. सध्या काही शाळामध्ये गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षणाच्या प्रयोगांमधून बघितलं जात आहे. ज्या शाळेमध्ये बदल झालेला दिसून येतो, अशा शाळांमध्ये उपयोगात आणली जाणारी शिक्षणपध्दती ज्ञानरचनावादी आहे, असेच म्हणावे लागेल.

आज संपूर्ण देश आणि वेगवेगळया राज्यातील शिक्षण क्षेत्रातील परिस्थितीचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येईल की, काही ठिकाणी तुरळक ठिकाणी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचली आहे. परंतु आजही काही पाडयावरती, वाडी–वस्तीवरती शिक्षणाचे प्रसार झालेले नाही किंबहूना त्यासाठी शाळा फक्त नावारूपास कार्य करीत असलेले दिसून येईल. परंतु समग्र समाजातील तळागाळातील लोंकाना हक्काचे शिक्षण मोफत मिळाले तर सर्व समाजातील विकासाच्या परिघाच्या बाहेर असलेले



Scanned with OKEN Scanner

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

जनसमूदाय देखील विकसित होतील. तेव्हाच हा देश असेल किंवा देशापुढील आव्हाने असतील ते कमी होवू शकतील आणि आपणास शाश्वत विकासाची ध्येय साध्य करता येईल.

ज्या देशाचे शिक्षण दर्जेदार आहे तोच देश जगात अग्रगण्य प्रगतिपथावर असणार हे निश्चित आहे. कारण त्या देशाची पिढी त्या देशाच्या शिक्षणावर घडत असते आणि पिढी तशीच घडणार जसे त्या देशाचे शिक्षण असणार आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे होऊन गेली, पण देशात शिक्षणाची काय स्थिती आह? जागतिक स्तरावर देशाचा शिक्षणात काय दर्जा आहे? असे म्हटले जाते की, शिक्षकासारखा दुसरा पवित्र पेशा नाही, पण आज जीवनात किती टक्के शिक्षक/प्राध्यापक अंतर्मनाने गर्वित होवून सांगू शकतात की, त्यांनी आपल्या पदाशी योग्यपणे न्याय दिलाय? देशाचा एवढा विकास झाला असून जगातील प्रतिष्ठित विद्यापीठांत, शिक्षण संस्थानांत आपल्या देशाचे नाव का येत नाही, देशातील शैक्षणिक विभागात नवनवे लक्ष्य साध्य करण्याकरिता शासनातर्फे पुष्कळशा योजनांचा निर्धार केला जातो. या कामात कित्येक स्वयंसेवी संघटना देखील सोबतीला असतात. एवढं करून सुद्धा गुणवत्तेत वाढ होत नाही. शिक्षणाचा मुख्य हेतू असा असतो की, मानवाला सुसंस्कृत, सुशिक्षित मार्गाने असा कर्तबगार बनवणे की, जेणे करून चांगली नोकरी व व्यवसाय करून वैध मार्गाने पैसा मिळवून आपल्या परिवाराचे योग्य पालन करून समाजाच्या विकासात साहय करू शकेल, पण हा उद्देश योग्यपणे पूर्ण होत आहे का, दरवर्षी देशात लाखो विद्यार्थी पदव्या घेऊन विद्यापीठातून बाहेर पडतात, पण त्या पदव्या फक्त नावापुरत्याच मर्यादित ठरतात. कारण ते उत्कृष्ट कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करीत नाही. म्हणजेच देशात गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षणाचा फार मोठा अभाव आहे. म्हणून ही उणीव भरून काढावयाची असेल तर भारत असेल किंवा भारतासारख्या अनेक देशात आजही शिक्षण क्षेत्रातील अधोगती दिसून येते, त्यांचे निर्मूलन करावयाचे असेल तर आपणास गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची निर्मिती करणे व शासनाच्या माध्यमातून सर्वच स्तरातील शिक्षणविषयक धोरणात बदल घडवून आणणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या शिक्षण व्यवस्थेत बदल होईल आणि शाश्वत विकासाची ध्येय त्या देशाला प्राप्त करता येईल.

**निष्कर्ष :**

शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी १७ कलमी कार्यकम जसे महत्वपूर्ण आहेत, तसेच शिक्षण हा एक घटक समाज परिवर्तनासाठी आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्वाचे असलेले दिसून येते. सामाजिक, मानवी आणि आर्थिक विकास जसे महत्वाचे आहेत तसेच निरंतर अथवा शाश्वत विकास देखील समाजाला विकासाच्या प्रक्रियेत कायमस्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून हे सर्व साध्य करण्यासाठी कोणत्याही राष्ट्राला आपल्या देशातील शिक्षण हे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देवून स्वत:च्या देशातील शिक्षण पध्दतीमुळे रोजगार निर्मीती करता येईल, असे प्रयत्न त्या देशातील शिक्षण व्यवस्थेने करणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :**

[1] जाधव रवि, गायकवाड गौतम, (२०१५) शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
[2] कांबळे नारायण, (२०१३) उच्च शिक्षणापुढील आव्हाने, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
[3] दै. सामना, (५ सप्टेंबर, २०१९) शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे नितांत गरजेचे.
[4] बवले कैलास (२०१८) शाश्वत विकासाचे पंचघटक, उषा–अनिल प्रकाशन, पुणे.



Scanned with OKEN Scanner